N.C.R.B.
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** धुळे
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0055 3092/2020 **P.S.(ठाणे):** शिरपूर तालुका पोलीस स्टेशन **Year (वर्ष):** 2020
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 29/02/2020 19:39 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
   1. **Day(दिवस):** शनिवार
   **Time Period (कालावधी):** पहर 4
   **Date From (दिनांक पासून):** 29/02/2020
   **Date To ( दिनांक पर्यंत):** 29/02/2020
   **Time From (वेळेपासून):** 11:27 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 11:27 बजे

   (b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
   **Date (दिनांक ):** 29/02/2020 **Time (वेळ):** 18:41 बजे

   (c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**
   **Entry No. (नोंद क्र.):** 016 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 29/02/2020 18:41 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
   1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** उत्तर, 20 किमी
   **Beat No. (बिट क्र.):**
   (b) **Address (पत्ता):** प्रधानमंत्री आवास , शेमल्या ,शिरपुर
   (c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
   **Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
   **District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**
   (a) **Name (नाव):** सरकल दिता पावरा
   (b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**
   (c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1988
   (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत
   (e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**
   (f) **Passport No.(पारपत्र क्र.):**
   **Date of Issue (दिल्याची तारीख):**
   **Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**
   (g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
   ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

   (h) **Address (पत्ता):**

(h) Address (पत्ता):

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | शेमल्या ,शिरपुर ,शिरपूर तालुका पोलीस स्टेशन,धुळे,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | शेमल्या ,शिरपुर ,शिरपूर तालुका पोलीस स्टेशन,धुळे,महाराष्ट्र,भारत |

(i) Occupation (व्यवसाय):

(j) Phone number (फोन नं.):

Mobile (मोबाइल नं.):

7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | भुषण शामराव वाघ | | | 1. 31,वलववाडी शिवार,श्रम साफल्य कालनी ,देवपुर ,धुळे ,धुळे,महाराष्ट्र, भारत |

8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

10 Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11 Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

12 First Information contents (प्रथम खबर हकीकत ):

मी श्री.सरकल दिता पावरा, वय 32 वर्षे, धंदा षेती व तंटामुक्ती अध्यक्ष, शेमल्या रा. मु.शेमल्या, पो.पळासनेर ता.शिरपुर जि.धुळे मो.नं. 8308371081समक्ष पोलीस स्टेशनला हजर राहुन फिर्याद देतो की, मी वरील ठिकाणी कुटूंबासह राहतो. मी षेती करीत असुन शेमल्या गावामध्ये तंटामुक्ती अध्यक्ष म्हणुन कार्यरत आहे. मला प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत सन 2018-2019 मध्ये शेमल्या गावात घरकुल मंजुर झालेले आहे. सदर घरकुलाचे फोटो काढुन नजरी तपासणी करुन त्याचे मुल्यांकन शिरपुर पंचायत समिती कार्यालयात सादर करण्यासाठी मी पंचायत समिती कार्यालय, शिरपुर येथील बांधकान विभागातील इंजीनिअर श्री.भुषण वाघ यांची भेट घेतली असता, त्यांनी माझे मंजुर घरकुलाचे फोटो काढुन नजरी तपासणी करुन त्याचे मुल्यांकन पंचायत समिती कार्यालयात सादर करण्यासाठी माझेकडे 2,000/- रु. लाचेचा मागणी केलेली होती. परंतु मला त्यांना लाच देण्याची ईच्छा नाही. माझा इंजीनिअर श्री.भुषण वाघ यांचेशी कोणताही वाद नसुन उसनवारीचा व्यवहार नाही.मी दि.24/02/2020 रोजी पंचायत समिती कार्यालय, शिरपुर येथील बांधकाम विभागात जावुन इंजीनिअर श्री.भुषण वाघ यांची भेट घेवुन माझे वरील कामासंदर्भात चर्चा करणार आहे, दरम्यान त्यांनी माझेकडे लाचेची मागणी केल्यास त्यांचेवर कायदेशिर कारवाई करणेकरिता दि. 24/02/2020 रोजी पोलीस निरीक्षक श्री.प्रकाश झोडगे यांना लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, धुळे येथे माझे स्वहस्ताक्षरात लेखी तक्रार दिली.माझे तक्रारीच्या अनुशंगाने पडताळणी कारवाई करणे असल्याने पोलीस निरीक्षक श्री.प्रकाश झोडगे यांनी दोन शासकीय पंचांना बोलावुन घेतले. त्यावेळी पंच(1)श्री. सुदाम रामदास जाधव  व पंच(2)श्री. महेंद्र भास्कर आखाडे यांची, स्टाफची व माझी एकमेकांना ओळख करुन दिली. श्री.झोडगे यांनी दोन्ही पंचांना थोडक्यात हकीगत सांगुन मी दिलेली लेखी तक्रार पंचांना वाचण्यास दिली. सदर तक्रारी अर्जावर दोन्ही पंचांनी व श्री.झोडगे यांनी स्वाक्षरी केली.त्यानंतर श्री.झोडगे यांनी डिजीटल व्हईस रेकर्डरची सविस्तर माहिती देवून मला व पंच नं.1 श्री.जाधव यांना शिरपुर शहरातील पोलीस वसाहतीजवळील पाण्याच्या टाकीजवळुन व्हईस रेकर्डर सुरू करुन इंजिनिअर भुषण वाघ यांची पंचासमक्ष लाच मागणीची पडताळणी करण्यांत येणार असल्याचे सांगीतले. त्याप्रमाणे मी, पंच नं.1 श्री.जाधव असे माझे मोटार सायकलने आणि आमचे मागोमाग श्री.झोडगे, पंच नं.2 श्री. आखाडे व स्टाफ असे काली पिली वाहनाने शिरपुर शहरातील पोलीस वसाहती जवळील पाण्याच्या टाकीजवळ आलो. तेथुन पडताळणी करण्याकरिता मला व पंच नं.1 श्री.जाधव असे आम्हाला श्री.झोडगे यांनी सुचना देवून, व्हईस रेकर्डर सुरू करून, माझेकडे देवुन मला व पंच नं.1 श्री.जाधव यांचेसह माझे मोटार सायकलीने शिरपुर शहरातील पंचायत समिती कार्यालयातील बांधकाम विभागात इंजिनिअर श्री.भुषण वाघ यांचे भेटीकरीता रवाना केले. त्यावेळी श्री.झोडगे, पंच नं.2 श्री.आखाडे व स्टाफ असे पोलीस वसाहतीजवळील पाण्याच्या जवळ काली पिली वाहनात थांबुन राहीले. पडताळणी दरम्यान मी व पंच नं.1 श्री.जाधव असे माझे मोटार सायकलीने पंचायत समिती कार्यालयातील बांधकाम विभागातील एका कक्षात गेलो असता तेथे इंजिनिअर श्री.भुषण वाघ यांना हाताने अभिवादन करुन त्यांनी माझेकडे पंतप्रधान आवास योजने अंतर्गत मंजुर झालेल्या घरकुलाचे फोटो काढुन, नजरी तपासणी करुन त्याचे मुंल्याकन पंचायत समिती कार्यालयास

सादर करण्यासाठी 2,000/- रुपये लाचेची मागणी करुन शुक्रवारी अगर शनिवारी शेमल्या ता. शिरपुर गावी आल्यावर देण्याबाबत सांगितले असे जबा आम्ही परत आलो. तेथे आम्ही दोघांनी सांगीतलेल्या हकीगतीवरुन व डिजीटल व्हईस रेकर्डरमध्ये माझेत इंजिनिअर श्री.वाघ आमचेत झालेले संभाषण श्री.झोडगे, पंच व आम्ही सर्वांनी ऐकल्यानंतर माझेकडे इंजिनिअर श्री.वाघ यांनी 2,000/- रुपये शुक्रवारी अगर शनिवारी शेमल्या गावी आल्यानंतर देण्याचे सांगितल्याची खात्री झाल्याने शिरपुर येथील रिक्रेशन गार्डनजवळ झाडाखाली काली पिली वाहनात तसा श्री. झोडगे यांनी सविस्तर पडताळणी पंचनामा केला आहे.दिनांक 29/02/2020 रोजी मी षेमल्या गायाचे अलीकडे एक किलोमीटर अंतरावर आलो. त्यावेळी आपण, पोलीस निरीक्षक श्री.मंजितसिंग चव्हाण, दोन्ही पंच, तसेच स्टाफ असे काली पिली वाहनाने आल्यानंतर आपण सापळा कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सविस्तर सुचना देवुन माझेकडुन सापळा कारवाईसाठी वापरण्यात येणारी लाच रक्कम 2,000/- रू. (500 रू. दराच्या 04 चलनी नोटा) घेतल्या. सदर नोटांचे क्रमांक नोंदवुन, नोटांना ॲंथ्रासिन पावडर लावण्यात येणार असल्याचे सांगुन त्याचे गुणधर्म व प्रात्यक्षिक करून दाखविले. तद्नंतर लाचेच्या नोटांना ॲंथ्रासिन पावडर लावून सदर रक्कम माझे पन्टचे उजवे खिषात ठेवण्यात आली. इंजिनिअर श्री.वाघ यांनी स्वतः किंवा इतर व्यक्तीच्या माध्यमातुन लाच रक्कम स्विकारल्यावर माझे डावे हाताने डोक्यावरुन हात फिरवीण्याचा लाच स्विकारल्याचा सापळा पथकास इशारा करणेबाबत व सदर इषारा मिळताच लाच रक्कम स्विकारणा-या यांना रंगेहात पकडतील असे सांगण्यात आले. तसा श्री.झोडगे यांनी सापळा पुर्व पंचनामा करून सापळा कारवाईचे नियोजन केले. दरम्यान आपले सुचनेवरुन मी इंजिनिअर श्री.वाघ यांना फोनकरुन केव्हा येणार बाबत विचारले असता इंजिनिअर श्री.वाघ यांनी दहा मिनिटात येतो बाबत सांगितल्याने श्री. झोडगे यांनी सापळा कारवाईकरिता मला व पंच नं.1 श्री.जाधव यांना शेमल्या गावातील माझ्या पंतप्रधान आवास योजने अंतर्गत मंजुर घरकुलाचे जवळ रस्त्याचे कडेला काली पिली वाहनातुन व्हईस रेकर्डर सुरु करून इंजिनिअर श्री.वाघ यांना लाच देण्याकरिता रवाना करणार असल्याचे सांगीतले. तेथुन सापळा कारवाईकरिता मला व पंच नं.1 श्री.जाधव असे आम्हाला श्री.झोडगे यांनी पुन्हा सुचना देवून, व्हईस रेकर्डर सुरु करून, माझ्याकडे दिल्यानंतर आम्ही दोघे पायी चालत माझ्या घरी आलो. आमचे मागोमाग श्री.झोडगे, श्री.चव्हाण, पंच नं.2श्री.आखाडे व स्टाफ असे काली पिली वाहनातुन उतरुन पायी चालत येवुन माझ्या घराचे आजुबाजुला तसेच आवारात थांबुन राहीले. मी व पंच नं.1 श्री.जाधव असे माझ्या घराच्या समोर अंगणात असतांना लागलीच इंजिनिअर श्री.भुषण वाघ हे तेथे आले व त्यांनी मला माझ्या घरकुला समोर उभे करुन फोटो काढले, व घरकुलाच्या पहील्या खोली मध्ये आल्यावर त्यांनी माझेकडे त्यांचे उजव्या हाताचे बोटांनी इशारा करुन लाचेची मागणी केली म्हणुन मी माझे पन्टचे उजवे खिषातुन ॲंथ्रासिन लावलेली लाचेची रक्कम 2,000/- रू. काढुन इंजिनिअर श्री.वाघ यांचे समोर धरली असता, त्यांनी त्यांचे उजवे हाताने लाचेची रक्कम स्विकारुन, त्यांचे पन्टचे उजवे बाजुकडील पुढील खिषात ठेवली. त्यानंतर मी सापळा पथकास माझे डावे हाताने माझे डोक्यावर हात फिरवुन लाच रक्कम स्विकारल्याचा पुर्व नियोजीत इशा रा केला. सदर इशारा देताच श्री. झोडगे, श्री.चव्हाण, पंच नं.2 श्री.आखाडे व सापळा पथकातील कर्मचारी असे माझ्या घरातील पहील्या रुममध्ये आले. तेथे माझेकडुन लाचेची रक्कम स्विकारलेले इंजिनिअर श्री.भुषण वाघ यांना माझे व पंच नं.1 श्री.जाधव यांचे सांगणेकरून श्री.झोडगे यांचे सुचनेवरुन सापळा पथकाने अटकावुन ठेवले. त्यानंतर अटकावुन ठेवलेले तथा माझेकडुन 2,000/- रू. लाच स्विकारलेले इंजिनिअर श्री.भुषण वाघ यांना श्री.झोडगे यांनी त्यांची, दोन्ही पंचांची व सापळा पथकाची ओळख देवुन, त्यांना त्यांचे नांव गाव विचारता, त्यांनी त्यांचे नाव भुषण शामराव वाघ, वय 25 वर्षे,व्यवसाय गृह निर्माण अभियंता (कंत्राटी) पंचायत समिती शिरपुर, रा. प्लट नं.31, श्रमसाफल्य कलनी, होमगार्ड ऑफिसचे पाठीमागे,वलवाडी देवपुर, धुळे असे सांगीतले आहे.त्यानंतर श्री.झोडगे यांचे सुचनेवरुन सापळा पथकाने श्री.भुषण वाघ यांना रंगेहात पकडुन पुढील कारवाई केली. तसा श्री. झोडगे यांनी शिरपुर तालुका पोलीस स्टेशन येथे सविस्तर यशस्वी सापळा पंचनामा केला आहे.तरी दि.29/02/2020 रोजी लोकसेवक भुषण शामराव वाघ, वय 25 वर्षे,व्यवसाय गृह निर्माण अभियंता (कंत्राटी) पंचायत समिती शिरपुर, रा.श्रमसाफल्य कलनी, होमगार्ड ऑफिसचे पाठीमागे,वलवाडी देवपुर, धुळे यांनी माझ्याकडे माझे पंतप्रधान आवास योजने अंतर्गत मंजुर झालेल्या घरकुलाचे फोटो काढुन, नजरी तपासणी करुन त्याचे मुंल्याकन पंचायत समिती कार्यालयास सादर करण्यासाठी 2,000/- रुपये लाचेची मागणी करुन दि.29/02/2020 रोजी सुमारे 11.27 वाजता माझे शेमल्या ता. शिरपुर गावी माझे पंतप्रधान आवास योजने अंतर्गत मंजुर घरकुलाचे घरातील पहील्या खोलीमध्ये स्विकारुन स्वतःचे आर्थिक फायद्यासाठी भ्रष्ट व बेकायदेशिर मार्गाचा अवलंब करून अनाधिकाराने पदाचा दुरूपयोग केला म्हणुन त्यांचेविरूध्द भ्रष्टचार प्रतिबंधक अधिनियम सन 1988 (संशोधन 2018) चे कलम 7 प्रमाणे माझी कायदेशिर फियादि आहे.

**13.Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**

**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरुन अपराध घडल्याचे.)** **or (किंवा)**

**(1) Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

**(2) Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव): PRAKESH LAXMAN ZODGE

**Rank (पद):** I (Inspector)

**No.(क्र.):** 1981 **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or (किंवा)**

**(3) Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) Transferred to P.S.(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

District (जिल्हा):

on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)

14. Signature/Thumb impression of the complainant / informant.(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

(प्रकाश ल.झोडगे)
पोलीस निरीक्षक
ॲन्टी करप्शन ब्युरो,धुळे

Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची

Name (नाव): Abhishek Dilip Patil
Rank(पद): I (Inspector)
No.(सं.): 15101000402ADPM8401U